नियमित दिवाणी मुकदमा क्र.०१/२०११

नि. १३१

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— चंद्रकांत वडीलांचे/पतीचे नांव — दत्ताराम भगत
वय सुमारे ७२ वर्षे, धंदा— सेवानिवृत्त शिरस्तेदार
रा. झाराप ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. अे.अे मालवणकर यांचेतर्फे

१. वादी मंगेश श्रीधर उर्फ गुंडू वेंगुर्लेकर यांना मी ओळखतो. साक्षीदारास नि. १ दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा दाखवून प्रश्न विचारण्यात आला. हा नकाशा मी तयार केलेला आहे. त्यावर माझी सही आहे. नकाशावरील नमुद समजुतीच्या टिपा मी स्वत: लिहिलेल्या आहेत. नकाशातील संपूर्ण मजकूर माझ्या माहितीनुसार बरोबर आहे. सदरचा नकाशा **नि. १३२** कडे आहे. सदरचा नकाशा बांबर्डे तर्फा माणगांव येथील स.क्र.८४ हि.क्र. ३ व ४ याबाबत काढलेला आहे. सदरच्या नकाशामध्ये वेंगुर्लेकर यांच्या जमीनीत पुनाळेकर यांनी कसे अतिक्रमण केलेले आहे ते दाखवले आहे. क, ख, ग, घ, ट, न, ढ, ड, ठ या आद्याक्षराने दाखविल्याप्रमाणे अतिक्रमण झालेले आहे. सदरचा नकाशा मी जागेवर जावून पाहून काढलेला आहे.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.व्ही. भांडारकर यांचेतर्फे**

**२.** प्रतिवादीतर्फे दाखल अर्ज नि. १३३ वरील आदेशानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—
(एस्. ए. कानशिडे)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
कुडाळ.

दिनांक :—१७/१०/२०१९.